महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
वाणिज्य विभाग, प्रकाशगड - ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई -५१
फोन: (वै) २६४७२६४५ (का) २६४७४२११: फॅक्स २६४७८५४४

व्र.मु.अ(वा)/लेखा/ग्रा.प.दिवाबत्ती/५५/२००७-०८/५६९ दिनांक- ०७/०१/२००८

परिपत्रक व्र.७३

विषय: - ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बीलांची रक्कम देण्यासाठी सन २००७-०८ च्या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. ३७.१३ कोटी (रुपये सदतीस कोटी तेरा लाख फक्त).

संदर्भ: - १) शासन निर्णय व्र.बीजीटी २६०७/प्र.व्र.४३०१/परा-४(२२) मंत्रालय, मुंबई -३२ दि. ३० नोव्हेंबर २००७.

२) या कार्यालयाचे पत्र व्र. मु.अ(वा)/लेखा/ग्रा.प.दिवाबत्ती/५५/२००७-०८/ ३१४१६ दि. ०४.०८.२००७.

ग्रामपंचायतीच्या हददीतील रस्त्यावरील दिवाबत्तीचे देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते. सन २००७-०८ च्या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११६,०६,७०,००/- (रु. एकशे सोळा कोठी सहा लक्ष सत्तर हजार फक्त) इतकी तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे, पैकी रक्कम रु. ५८,०३,००,०००/- (रु. अठ्ठावन कोटी तीन लाख फक्त) वरील संदर्भिय व्र. २ नुसार आपल्या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. तसेच आता रु. ३७,१३,००,०००/- (रु. सदतीस कोटी तेरा लाख फक्त) शासन निर्णय व्र.बीजीटी २६०७/प्र.व्र.४३०१/परा-४(२२) दिनांक ३० नोव्हेंबर २००७, सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून पुस्तकी समायोजनेद्वारे म.रा.वि.वि.कं.मर्यादितला रक्कम प्राप्त झाली आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे,संबंधित जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधीतानी जरुर ती कार्यवाही करावी.

क्षेत्रीय कार्यालयाने कळविल्यानुसार चालु वीज बिलापोटी (२००७-०८) एकुण रुपये ९५.१६ कोटीच्या मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता तदवत पुस्तकी समायोजनेव्दारे शासनाकडून रुपये ९५.१६ कोटी कंपनीस प्राप्त झालें आहेत म्हणजेच उपरोक्त प्राप्त रक्कम ग्रामपंचायात दिवाबत्ती पोटी समायोजित केल्यास दि. ३१.३.२००८ अखेर थकबाकी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ३१.३.२००८ अखेर थकबाकी राहत असल्यास अथवा शासनाकडून प्राप्त रक्कम कमी अथवा जास्त राहत असल्यास संबंधित बाबीचे या खुलाश्यासह या कार्यालयास कळविण्यात यावे, वस्तुनुसार सन २००८-०९ च्या सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज या कार्यालयास त्वरित सादर करावा.

थकबाकीपोटी समायोजित करण्यात आलेल्या रकमेचे, (सन २००७-०८) ग्रामपंचायात निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.

सहपत्र: - वरीलप्रमाणे

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्र त सविनय सादर,

१.संच ालक (वित्त),म.रा.वि.वि.कंपनी मय ादित,मुंबई

प्र त सस्नेह रवाना

१. सर्व मुख्य अभिय ंता म.रा.वि.वि.कंपनी मय ादित, संवसु परिमंडळ काय ालय . माहिती व उच ित काय वाहीसाठी

२.मुख्य महाव्य ावस्थापक (वित्त व लेखा),म.रा.वि.वि.कंपनी मय ा.मुंबई.

प्र त रवाना

१.सर्व अधिक्षक अभिय ंता,संवसु मंडळ काय ालये,म.रा.वि.वि.कंपनी मय ादित,

२.सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग) मुंबई

३.सर्व काय कारी अभिय ंता,संवसु विभागीय काय ालये,म.रा.वि.वि.कंपनी मय ादित

४.सर्व उपकाय कारी अभिय ंते/सहाय य क अभिय ंते संवसु उपविभागीय काय ालये,

----- उच ीत काय वाहीसाठी.